# बृहन्मुंबई महानगरपालिका
## कामगार विभाग

दिनांक: ०९.४.२०२०

**जाहिरात**

**(अर्ज करण्याचा अंतिम दिनांक: १७.०४.२०२० सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत)**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये 'कोव्हीड-१९' या रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये 'कोव्हीड-१९'ची बाधा झालेल्या रुग्णांची संख्यादेखील सतत वाढत आहे. त्यामुळे केवळ 'कोव्हीड-१९'ची बाधा झालेल्या रुग्णांची सेवा तसेच यासंदर्भातीलच इतर कामकाज करण्यासाठी कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या अखत्यारितील विशेष रुग्णालयातील रिक्त असलेली 'कक्ष परिचर' ही पदे अर्ज मागवून भरण्यासाठी जाहिरात देण्यात येत आहे.

सदर पदांचा सामाजिक व समांतर आरक्षण दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे:

| | | रिक्त पदांची प्रवर्गनिहाय संख्या | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदाचे नाव** | **एकूणपदे** | **अजा** | **अज** | **विजाअ** | **भजब** | **भजक** | **भजड** | **विमाप्र** | **इमाव** | **एसईबीसी** | **ईडब्लयूएस** | **खुला** |
| कक्ष परिचर | **११४** | १८ | १३ | २ | १ | ४ | २ | ० | २५ | १५ | १२ | २२ |

**सामाजिक व समांतर आरक्षण**

| **तपशील** | **अजा** | **अज** | **विजाअ** | **भजब** | **भजक** | **भजड** | **विमाप्र** | **इमाव** | **एसई बीसी** | **ईडब्लयू एस** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण सामाजिक आरक्षणांतर्गत भरावयाची पदे | ६ | ४ | १ | १ | २ | १ | ० | ७ | ४ | ३ | ८ | ३७ |
| 30% महिला आरक्षण | ५ | ४ | १ | ० | १ | १ | ० | ८ | ५ | ४ | ७ | ३६ |
| माजी सैनिक 15% | ३ | २ | ० | ० | १ | ० | ० | ४ | २ | २ | ३ | १७ |
| भूकंपग्रस्त 2% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| प्रकल्पग्रस्त 5% (केवळ मनपा प्रकल्पांसाठी) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ६ |
| खेळाडू 5% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ६ |
| बृहन्मुंबई मनपा मध्ये प्रशिक्षण घेतलेल्या व NCTVT परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार 10% | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | २ | १ | २ | ११ |
| **एकूण** | **१८** | **१३** | **२** | **१** | **४** | **२** | **०** | **२५** | **१५** | **१२** | **२२** | **११४** |

दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असलेली ४ पदे ही उपरोक्त तक्त्यात समाविष्ट आहेत. तथापि शासन निर्णय क्र. दिव्यांग/२०१८/प्रक्र ११४/१६अ दिनांक २९.५.२०१९ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार पदनिश्चितीची कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण केल्यानंतर दिव्यांग व्यक्तींसाठी ४ पदे भरण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल. तोपर्यंत नि:समर्थ व्यक्तींसाठी आरक्षित ४ पदे खुल्या प्रवर्गातील एकूण रिक्त पदांमधून रिक्त ठेवण्यात येत आहेत.

**शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणी:**

शैक्षणीक अर्हता: किमान एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा १०० गुणांच्या मराठी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

वेतनश्रेणी: लेव्हल एन-९ रु. १८०००/- ते रु. ५६९००/- + अनुज्ञेय भत्ते.

**वयोमर्यादा, वजन व उंची :**

**उमेदवाराचे वय** दिनांक ३१.३.२०२० रोजी

1) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत - १८ ते ३८ वर्ष

2) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत - १८ ते ४३ वर्षे

3) माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्ष इतकी राहील. तसेच माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

4) तसेच शासन निर्णय क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ दि.०६ ऑक्टोबर २०१० नुसार (अ) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, या घटकातील उमेदवारांची कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. सदर वयोमर्यादा सरसकट शिथिल केलेली असल्याने या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकीच राहील.

5) शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता या पदासाठी असलेली वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल. उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहिल.

6) केवळ बृहन्मुंबई महागनरपालिकेमधून प्रशिक्षण घेऊन NCTVT उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

**वजन व उंची**

अ) पुरुष उमेदवार: किमान वजन ५० कि.ग्रॅ. व उंची १५७ सें.मी.

ब) स्त्री उमेदवार: किमान वजन ४५ कि.ग्रॅ. व उंची १५० सें.मी.

**निवडीचे निकष:**

१) सदर भरती प्रक्रिया ही केवळ कोव्हीड-१९ बाधीत रुग्णांशी संबंधित असलेल्या कामकाजासाठी करण्यात येत आहे.

२) पात्र उमेदवारांची निवडयादी तयार करतांना एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षेत सर्व उत्तीर्ण विषयांमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीनुसार अधिकतम गुणांनुसार (सामाजिक व समांतर आरक्षणानुसार) करण्यात येईल. (बेस्ट ऑफ फाईव्ह ची टक्केवारी विचारात घेतली जाणार नाही). दोन उमेदवारांना समान गुण असल्यास जो उमेदवार वयाने जेष्ठ आहे त्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

३) निवड केलेल्या उमेदवारास निवडीच्या दिवसापासून तीन दिवसांच्या आत नोकरीत दाखल होणे आवश्यक राहील. अन्यथा त्याची निवड आपोआप रद्द करण्यात येईल.

४) निवड करण्यात आलेल्या उमेदवाराची निवड ही वैद्यकीय तपासणी, शाळेचा दाखला, चारित्र्य पडताळणी तसेच इतर कागदपत्रे पडताळणीसापेक्ष असल्यामुळे उमेदवार कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.

**८. <u>सर्वसाधारण अटी</u> :-**

1. निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
2. उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन कोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.
3. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
4. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.
5. उमेदवाराने खालील नमूद केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

   अ. उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र, संबंधित गुणपत्रिका, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र, जाती वैधतेचे प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र यांच्या मूळप्रती व सांक्षांकित छायांकित प्रती.

   ब. विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

क. अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागासप्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे नवीनतम प्रमाणपत्र.

ड. महिला आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या अजा/अज प्रवर्ग वगळता खुल्या वर्गासहीत इतर सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही.

खुल्या वर्गातील महिला व अन्य समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निदेशानुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायांप्रती सादर करणे आवश्यक आहे.

इ. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' आणणे आवश्यक आहे.

ई. फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड इ. अर्जाबरोबर सादर करणे आवश्यक आहे.

6. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल.

7. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, १९९९ लागू होतील.

8. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम १९५३) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

9. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

10. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.बीसीसी/२०११/प्रक्र १०६४/२०११/१६ ब दि.१२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात/जमाती प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक आहे. परंतु जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

11. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून पडताळणी सापेक्ष करण्यात येत असल्यामुळे उमेदवारावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

12. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

13. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

14. प्रकल्पग्रस्तांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र. १० दि. ०३.०४.२००८ अन्वये मंजूर झालेली मार्गदर्शक तत्वे यानुसार नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महागनरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा उमेदवारांमधून प्रकल्पग्रस्तांसाठीची आरक्षित पदे भरण्यात येतील.

15. शासन अधिसूचना दि.२८.३.२००५ व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक दि.०१.७.२००५ लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

16. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभगाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/ प्र.क्र.५८१ए/१६-ब दिनांक ०४.७.२०१९ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गातील (एस.ई.बी.सी.) पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

17. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२.०२.२०१९ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या (इ.डब्ल्यू.एस.) पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

18. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे किंवा पूर्णपणे रद्द करण्याचे अधिकार महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
19. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
20. भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी आवश्यकतेनुसार कुठलीही चाळणी पध्दती वापरण्याचा हक्क प्रशासन राखून ठेवीत आहे. तसेच सदर भरती रद्द करण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.
21. निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

**समांतर आरक्षण**

अ) शासन नियमाप्रमाणे महिलांसाठी ३०% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात येईल. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ब) उपरोक्त रिक्त पदांपैकी शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्रक्र ६८/क्रीयुसे/२ दि.०१.७.२०१६ अन्वये शासनमान्य क्रीडाप्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी ५% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

क) प्रकल्पग्रस्तांसाठी: बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्रमांक १० दि.०३.४.२००८ अन्वये मंजुर झालेले मार्गदर्शन तत्वे यानुसार केवळ नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल प्रकल्पात संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षित पदे भरण्यात येतील.

ड) माजी सैनिक व भुंकपग्रस्त यांची शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार सदर पदे भरण्यात येतील.

**९. विशेष सूचना :**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादीचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.
2. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज सादर करु शकतात.
3. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
4. मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे.
5. इच्छुक उमेदवारांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावरुन अर्जाचा नमूना Download करावा आणि जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती व सुचनांनुसार बिनचूक भरावा आणि आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती PDF format मध्ये तयार करुन अर्जासह mcgm.wardboy@mcgm.gov.in या Email ID वर दिनांक १७.०४.२०२० रोजी सायंकाळी ०६.०० पर्यंत पाठवावा. ज्यांना शक्य असेल त्यांनी पोस्टाने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील गेट क्र. ७ या ठिकाणी ठेवलेल्या बॉक्समध्ये दिनांक १७.४.२०२० रोजी सायंकाळी ०६.०० पर्यंत पाठवावा. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
6. सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/- दि.०८.४.२०२० | सही/- दि.०८.४.२०२० | सही/- दि.०८.४.२०२० |
| प्रमुख कामगार अधिकारी | सह-प्रमुख कर्मचारी अधिकारी (मा.व.क.) | प्रमुख कर्मचारी अधिकारी |
| सही/- दि.०८.४.२०२० | सही/- दि.०८.४.२०२० | सही/- दि.०८.४.२०२० |
| सह-आयुक्त (सा.प्र.) | अतिरिक्त आयुक्त (प.उप.) | अतिरिक्त आयुक्त (शहर) |

महानगरपालिका आयुक्त

# MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI
## बृहन्मुंबई महानगरपालिका

अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवावा

प्रति
मान. महानगरपालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

**केवळ 'कोव्हीड-१९' बाधीत रुग्णांच्या सेवेसाठी 'कक्ष परिचर' या पदासाठी अर्ज**

संपूर्ण नाव
Full Name in English

वडिलांचे किंवा पतीचे संपूर्ण नाव (मराठीमध्ये)
Father's or Husband's Name (English)

कायमचा पत्ता
Permanent Address

ईमेल आयडी

भ्रमणध्वनी क्र.

लिंग (मराठीमध्ये) पुरुष/महिला
Gender (in English) Male/Female

वैवाहिक स्थिती अविवाहीत/विवाहीत

वजन (किलो)/Weight (kg) .............

उंची (सें.मी.)/Height (in centimeter) .............

जन्म तारीख दिनांक/महिना/वर्ष ...... ....... .......
Date of Birth Date/Month/Year ...... ....... .......

शैक्षणीक अर्हता

| | शाळेचे नाव | शालांत परीक्षा मंडळाचे नाव | परीक्षेचे एकूण सर्व विषयांचे गुण/पैकी | टक्केवारी | मराठीचे गुण/पैकी | पास झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता दहावी | | | | | | |

आपण सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिता का ? असल्यास योग्य त्या प्रवर्गावर '√' अशी खूण करावी

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | एसई बीसी | ईडब्लयू एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

आपण समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिता का ? असल्यास योग्य त्या प्रवर्गावर '√' अशी खूण करावी

| **३०% महिला आरक्षण** | **भूकंपग्रस्त २%** | **माजी सैनिक १५%** | **प्रकल्पग्रस्त ५% (केवळ मनपा प्रकल्पांसाठी)** | **खेळाडू ५%** | **बृहन्मुंबई मनपा मध्ये प्रशिक्षण घेतलेल्या व NCTVT परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार १०%** |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकल्पाचे नाव: | | मनपा खाते/विभाग/रुग्णालयाचे नाव: |

उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र

जातवैधता प्रमाणपत्र (असल्यास सादर करावे)

आपणाकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे का ?

स्थानिक पोलिस स्थानकाचा पत्ता

आपणाविरुध्द न्यायालयात यापूर्वी कोणत्याही प्रकारणी खटला दाखल करण्यात आला होता का ? होय/नाही

आपणाविरुध्द न्यायालयात खटला प्रलंबित आहे का ? होय/नाही

आपणाविरोधी कोणत्याही पोलीस ठाण्यात यापूर्वी कोणत्याही प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता किंवा कारवाई करण्यात आली होती का ? होय/नाही

DECLARATION/: I, hereby declare that all the statements made in this application are true and correct to the best of my knowledge and belief.

I understand that in the event of any information being found false or incorrect, my candidature for the applied post is liable to be cancelled/rejected at any stage of Recruitment/during the course of employment without any notice to me.

''मी, येथे असे प्रमाणित करतो/करते की, अर्जात दिलेली सर्व माहिती, माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास, माझी उमेदवारी भरतीच्या/नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर, पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.''

Date/दिनांक:

अर्जदाराची सही

<u>सोबत (आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती)</u>

1) एसएससी किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका
2) जन्माचा दाखला
3) शाळा सोडल्याचा दाखला
4) जातीचा दाखला/जात वैधता प्रमाणपत्र
5) समांतर आरक्षणांतर्गत अर्ज केल्यास त्यासंबंधातील प्रमाणपत्रे
6) छोट्या कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र
7) इतर प्रमाणपत्र

**<u>महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, 2005 मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना -अ</u>**

**<u>प्रतिज्ञापत्र</u>**

**<u>नमुना - अ (नियम 4 पहा)</u>**

**दिनांक:**

मी, श्री./श्रीम./कुमारी ------------------------------------------ श्री. ------------------------------------------ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ------ वर्षे, राहणार --------------- याद्वारे असे जाहीर करतो/करते की,

(1) मी कामगार/कक्ष परिचर/हमाल/आया इ. पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(2) आज रोजी मला ------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 28 मार्च 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------ आहे (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा).

(3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल यांची मला जाणीव आहे.

<u>ठिकाण:</u>

<u>दिनांक:</u>

सही/-